महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

यांत्रिकी मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

यांत्रिकी विभाग क्रमांक २, मुठा उजवा कालव्या शेजारी, स्वारगेट, पुणे ४११ ०३७.

निविदा सुचना क्रमांक ११ / २०२१-२०२२

खालील कामांच्या सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्रमांक २, स्वारगेट, पुणे ३७ (दूरध्वनि व फॅक्स क्रमांक ०२०-२४२६ ६०११) हे सदरहू कामासाठी निम्न कामाचा पुर्वानुभव धारकाकडून बी १ नमुन्यांत निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत खाली दर्शविल्याप्रमाणे रकाना क्रमांक ८ प्रमाणे सुटटीचे दिवस वगळून देण्यांत येतील. भरुन दिलेल्या निविदा खाली रकाना क्रमांक ९ प्रमाणे दुपारी १४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यांत येतील. अट असलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रुपये वस्तु व सेवा कर वगळुन	इसारा रक्कम रुपये	सुरक्षा ठेव रुपये	काम पूर्ण करण्याची कालमर्यादा	कोऱ्या निविदेची किंमत रुपये अधिक वस्तु व सेवा कर	कोऱ्या निविदा कार्यालयीन वेळेत खाली दर्शविलेल्या कालावधीत देण्यांत येतील	भरुन दिलेल्या निविदा खाली नमुद दिनांकापर्यंत स्विकारण्यांत येतील
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मा.अधीक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ पुणे या कार्यालयात संगणक प्रिंटर व नेटवर्क स्विच यांचे वार्षिक देखाभाल व दुरूस्तीचे काम करणे बाबत.	२,४५,९२०/-	२,५००/-	५०००/-	१ महीना	५००/- अधिक ९०/-	०७/०१/२०२२ ते १४/०१/२०२२	१८/०१/२०२२

टीप

१. वरील कामाची निविदा दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये व दोन्ही लिफाफे एकत्रित स्वतंत्र तिसऱ्या लिफाफ्यात भरुन पाठवावयाची आहे.

२. यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे ३७ या कार्यालयामध्ये नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल, कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचना प्रत विनामुल्य मिळेल.

३. कोऱ्या निविदा अर्जाची किंमत रोखीने किंवा मनीऑर्डरद्वारेच स्विकारण्यांत येतील निविदा अर्जाची किमत चेक, पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे स्विकारण्यांत येणार नाही.

४. जर निविदा पोस्टाने पाठविल्यास मोहरबंद लिफाफा देवाणघेवाण करण्यांत खराब झालेस किंवा निविदा अर्ज मिळण्यांस कोणताही विलंब झालेस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

५. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्रमांक २, स्वारगेट, पुणे ३७ यांच्या कार्यालयात निविदा स्विकारतील व उघडतील.

६. कोणतेही कारण न देता निविदेतील एखादी बाब किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जानार नाही.

७. कोरी निविदा मागताना मागील तीन वर्षात किमान निविदे एवढी व त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या प्रत्यक्ष वरील प्रमाणे कामे केलेल्या अनुभवी संस्थांना कोरी निविदा देय राहील. निविदा खरेदीचे वेळी तसा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. वरिल कामांचा यांत्रिकी संघटनेतील अनुभव असणाया अभिकरणास प्राधान्य राहील.

८. सदर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे वेबसाईट www.mahayantriki. gov.in वर पहावयास मिळेल.

जा.क्र. यांवि.२/लेखा-५/ ४६/- सन २०२१

यांत्रिकी विभाग क्रं.२, पुणे ३७.

दि:- ०४/०१/२०२२

कार्यकारी अभियंता

यांत्रिकी विभाग क्रं.२, पुणे ३७.

प्रत :- विभागीय कार्यालयाती सुचना फलकावर सर्वाचे माहीतीसाठी.